# WAGHOLI HOUSING SOCIETIES ASSOCIATION (WHSA)

**Address**: - Parijat-301, Som Terraces, Gat No-647, Wagholi, Haveli, Pune - 412207
**Reg. No.**: - U90009PN2019NPL181904 (Section 8 Company, Companies Act 2013)
**Phone**: - +91-9881056253, +91-9370116228
**Email**: - info@wagholihsa.org | **Web**: - www.wagholihsa.org

# Meeting with MSEDCL officials

Date: 08-July-2020

Meeting was organised by MLA Sh. Ashok Pawar with MSEDCL officials on 8th July 2020 at Chief Engineer's Office, Rasta Peth, Pune with reference to current issues pertaining to Power Supply and Billing issues of Wagholikars.

Wagholi Housing Societies Association had detailed proposals to solve issues permanently in the wake of frequent power outages in Wagholi.

**Attendees**

1. MLA Sh. Ashok Pawar
2. EE Mulshi MSEDCL Sh. Ravindra Singh Bundele
3. SDE MSEDCL – Sh. Amit Bharte
4. AE MSEDCL- Sh. Ganesh Shrikhande
5. PMRDA Additional EE – Sh. Pramod Babare
6. PMRDA EE – Sh. Kumbhar
7. PMRDA AE – Sh. Amit Hapaase
8. Wagholi Resident – Sh. Yogesh Suryawanshi
9. Wagholi Resident – Sh. Bhushan Kulkarni

**Following points were discussed**

1. Hon'ble MLA addressed the meeting saying that I am ready to help whatever I need to change the picture of Wagholi. A proposal has been submitted to the Ministry to get 132 KVA independent substation at Wagholi This substation has been sanctioned but is pending decision on expenses to be borne by either MSEB or Panchsheel. There is a plan to hold a joint meeting of the two in Mantralaya in this regard. If this happens, it will be possible to provide uninterrupted power supply at Wagholi.
2. Mr. Amit admitted that a separate under-ground incomer Line is being laid from Lonikand to Purvarang Sub Station but in some places the work has been stopped due to protests by affected citizens. Mr. Amit Bharte thanked MLA and said that they would complete the rest of the work post monsoon. This incoming line will make back feeding possible.
3. At present Wagholi branch has only 23 employees to cater to 60,203 customers. Considering the problem due to insufficient manpower, Hon'ble MLA asked Mr. Ravindra Bundele to appoint as many staff as possible at Wagholi immediately.
4. The Wagholi MSEDCL Section needs to be divided into three Sub-Sections, so 80 staff and three independent engineers will be available for the entire Wagholi village, which will make the work easier. Accepting this request, MLA Saheb said that he would try to divide Wagholi into three Sub-Sections by holding meetings at senior level as soon as possible.

**5.** Hon'ble MLA said that a meeting will be held at the senior level to make separate arrangements for Wagholi referring Shirur Pattern of 24 hours uninterrupted power supply.

**6.** The Hon'ble MLA said that the Deputy Executive Engineer as well as the Assistant Engineer should contact him directly if there is any problem

**7.** A permanent independent maintenance agency has been appointed for Wagholi and it will be operational soon.

**8.** MSEDCL will tighten the joints of the line asap.

**9.** If DO switches are installed, it will ensure that work for an impacted society can continue without turning off the feeder. Its installation at society's line should be done by MSEDCL asap.

**10.** MSEDCL requested the societies to co-operate with MSEDCL in keeping the area around the transformers clean, cutting down trees, grass etc. before they grow and ensure no garbage gets collected near transformers.

**11.** The new MSEDCL office in Wagholi will be full-fledged operational in next few days. If there is any problem, the MLA himself will take care of it.

**12.** Mr. Amit Bharte had a detailed discussion with Mr. Kumbhar Saheb, Chief Engineer, PMRDA regarding the high voltage power lines laid between Nagar Road.

Mr. Amit Bharte informed the Hon'ble MLA that there have been four correspondences with PMRDA on this issue so far but no concrete response or action has been taken by PMRDA so far.

Mr. Amit Bharte explained the seriousness of the issue to Hon'ble MLA in detail such as if high pressure pipes are buried in the ground and in case of breakdown there will be many technical difficulties in repairing it. Until then, it would not be appropriate to carry out any other type of relocation work. Also, in the current situation, if PMRDA starts work and a breakdown occurs, about 40,000 power consumers will be affected, which may likely lead to riots.

After hearing the matter quietly, the MLA asked Mr. Amit Bharte how much it would cost to lay a new cable. Mr. Amit Bharte informed that MSEDCL office has given a revised estimate of Rs. 1 crore 60 lakhs. He immediately informed about this and requested to issue another tender or revise this tender if required.
These four high voltage power lines have been buried in the road widening work between Wagheshwar Chowk for seven to eight feet and supply electricity to all the following societies.

On 9-July-2020, Mr. Kumbhar Saheb will inspect the site along with the Branch Engineer.

**13.** Regarding current Billing issue, in-depth discussion was done. MSEDCL has started help desk at Purvarang Sub Station and similar helpdesk will be organised at society level to sort out the issue as early as possible.

**WAGHOLI HOUSING SOCIETIES ASSOCIATION (WHSA)**
**Address**: - Parijat-301, Som Terraces, Gat No-647, Wagholi, Haveli, Pune - 412207
**Reg. No.**: - U90009PN2019NPL181904 (Section 8 Company, Companies Act 2013)
**Phone**: - +91-9881056253, +91-9370116228
**Email**: - info@wagholihsa.org | **Web**: - www.wagholihsa.org

## महावितरण अधिका-यांसोबत झालेल्या बैठकीचा वृतांत

वाघोली ०८ जुलै २०२०

वाघोली येथे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होण्यामुळे नागरिक त्रस्त आहेत त्या अनुषंगाने वाघोली हौसिंग सोसायटी असोसिएशन यांनी समस्या कायमस्वरूपी कशा प्रकारे सोडवता येतील सविस्तर अभ्यास करून विस्तृत निवेदन तयार केले होते.

सदर निवेदन आज मा. आमदार साहेबांच्या उपस्थितीत महावितरण च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले.

1. माननीय अशोक बापू पवार आमदार शिरूर-हवेली,
2. कार्यकारी अभियंता महावितरण श्री रवींद्र बुंदेले
3. उपविभागीय कार्यकारी अभियंता महावितरण श्री अमित भरते
4. सहाय्यक अभियंता महावितरण श्री गणेश श्रीखंडे
5. श्री कुंभार साहेब कार्यकारी अभियंता पीएमआरडीए
6. श्री अमित हसापे कनिष्ठ अभियंता पीएमआरडीए
7. श्री प्रमोद बाबरे अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण
8. श्री योगेश सूर्यवंशी वाघोली ग्रामस्थ
9. श्री भूषण कुलकर्णी वाघोली ग्रामस्थ

यांच्या उपस्थितीत आज दिनांक 8 जुलै 2020 रोजी मुख्य अभियंता यांचे कार्यालय रास्ता पेठ पुणे येथे वाघोली येथील विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी माननीय आमदार साहेबांच्या पुढाकाराने बैठक आयोजित करण्यात आली होती

बैठकीत चर्चा झालेले मुद्दे खालील प्रमाणे आहेत

**1.** "मला वाघोलीचे चित्र बदलायचे आहे त्यासाठी काय लागेल ती मदत मी करायला तयार आहे" अशा शब्दात माननीय आमदार साहेबांनी बैठकीला सुरवात केली.132 केवी स्वतंत्र उपकेंद्र वाघोली ला मिळण्याबाबत प्रस्ताव मंत्रालयात सादर करण्यात आलेला आहे हे उपकेंद्र मंजूर झालेले आहे फक्त तो खर्च एम एस ई बी ने करायचा की पंचशील ने त्याबाबतचे दोघांची एकत्रित मीटिंग घ्यायची आहे त्यावर निर्णय सदर बाबतीत मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक लावून हा विषय मार्ग काढणार असे आमदार साहेबांनी सांगितले सदर स्वतंत्र उपकेंद्र "EON-वाघोली" हे कार्यरत झाल्यास वाघोली येथे अखंड विद्युत पुरवठा करणे शक्य होईल.

**2.** लोणीकंद येथून पूर्वरंग सब स्टेशनला स्वतंत्र इन्कमर लाईन टाकण्याचे सुरू आहे परंतु काही ठिकाणी स्थानिकांनी विरोध करून काम बंद पाडले आहे यापूर्वी मी पोलीस इन्स्पेक्टर श्री मानकर साहेब यांची मदत घेऊन बरेचसे काम करून घेतले आहेत तरीसुद्धा काही ठिकाणी स्थानिकांच्या विरोधामुळे लाईन टाकने शक्य झालेले नाही असे श्री अमित भरते यांनी सांगितले त्यावर आमदार साहेबांनी पोलीस इन्स्पेक्टर श्री मानकर साहेब यांना फोन करून लाईन टाकण्यासाठी पोलीस प्रोटेक्शन देण्यात यावे असे सांगितले यावर अमित भरते यांनी आमदारांचे आभार मानत उर्वरित काम पाऊस कमी झाल्यावर पूर्ण करून घेऊ असे सांगितले. ह्या इन्कमर लाईन मुळे बॅक फिडिंग करणे शक्य होईल

**3.** सद्यस्थितीत वाघोली शाखे मध्ये 60,203 ग्राहक आहेत त्या तुलनेत फक्त 23 कर्मचारी आहेत अपुऱ्या मनुष्यबळामुळे होत असलेली अडचण लक्षात घेता तात्काळ शक्य तेवढा जास्त कर्मचारी वर्ग वाघोली येथे नियुक्त करण्यात यावा असे माननीय आमदार साहेबांनी श्री रवींद्र बुंदेले साहेब यांना दिले.

**4.** वाघोली शाखेचे तीन शाखेत विभाजन होणे आवश्यक आहे त्यामुळे 80 कर्मचारी व तीन स्वतंत्र अभियंते वाघोली गावासाठी मिळतील त्यामुळे त्यामुळे कामकाज सोपे होईल विभाजन होईपर्यंत कमीत कमी 35 कर्मचारी वाघोली शाखेला देण्यात यावे अशी विनंती वाघोली हाउसिंग सोसायटी असोसिएशन तर्फे करण्यात आली होती यावर उत्तर देतांना श्री बुंदिले साहेब यांनी महावितरणच्या वरिष्ठ पातळीवर यासाठी प्रयत्न आमदार साहेबांनी करावे अशी विनंती केली ही विनंती मान्य करत आमदार साहेब यांनी लवकरात लवकर वरिष्ठ पातळीवर बैठक घेऊन वाघोली चे तीन शाखेमध्ये विभाजन करण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले

**5.** शिरूर च्या धर्तीवर वाघोली साठी स्वतंत्र व्यवस्था करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर बैठक घेणार असे श्री आमदार साहेब यांनी सांगितले

**Address**: - Parijat-301, Som Terraces, Gat No-647, Wagholi, Haveli, Pune - 412207
**Reg. No.**: **-** U90009PN2019NPL181904 (Section 8 Company, Companies Act 2013)
**Phone**: - +91-9881056253, +91-9370116228
**Email**: - info@wagholihsa.org | **Web**: - www.wagholihsa.org

**6.** उपकार्यकारी अभियंता तसेच सहाय्यक अभियंता यांनी काही समस्या असल्यास प्रत्यक्ष माझ्याशी संपर्क करावा असे माननीय आमदार साहेब यांनी सांगितले

**7.** वाघोली साठी स्थायी स्वरूपी स्वतंत्र मेंटेनन्स एजन्सी ची नियुक्ती करण्यात आली आहे ती लवकरच वाघोली येथे कार्यरत होईल यामुळे वाघोली येथे लाईन मध्ये बिघाड झाल्यास तात्काळ मेन्टेनन्स टीम तिथे पोहोचून योग्य तो दुरुस्ती करू शकेल अशी माहिती श्री बुंदेले सरांनी दिली

**8.** महावितरण तर्फे लाईनचे जॉइन्ट्स घट्ट करण्यात येतील.

**9.** डिओ स्विच बसविल्यास विशिष्ट सोसायटीची लाईट गेल्यास फिडर बंद न करता काम करणे शक्य होईल त्यामुळे सोसायटीच्या लाइन ला बसविण्याचे काम महावितरण तर्फे करण्यात यावे असे निवेदन करण्यात आले होते त्यावर उत्तर देताना बुंदेले साहेब म्हणाले की मेन्टेनन्स करताना सदर बसविण्याचे काम करून घेऊ

**10.** सोसायट्यांनी आपल्या परिसरातील ट्रांसफार्मर च्या आसपासचा परिसरात स्वच्छता ठेवणे, झाडे, गवत इत्यादी उगवल्यास ते कापणे तसेच कचरा इत्यादी ट्रांसफार्मर शेजारी गोळा न करणे इ काळजी घेऊन महावितरण ला सहकार्य करावे असे महावितरण तर्फे विनंती करण्यात आली

**11.** वाघोली येथील महावितरणचे कार्यालय **लवकरच नवीन इमारतीत स्थानांतरित करण्यात यावे** काही अडचण असल्यास प्रत्यक्ष आमदार साहेबांसोबत संपर्क करावा असे स्वतः आमदार साहेब यांनी सूचना दिल्या.

**12.** नगर रोड रस्ता दरम्यान गाडल्या गेलेल्या **उच्च दाब वीज वाहिन्या संदर्भात** पीएमआरडीए मुख्य अभियंता श्री कुंभार साहेब यांच्यासोबत श्री अमित भरते यांनी सविस्तर चर्चा केली.

श्री अमित भरते यांनी माननीय आमदार साहेबांना सांगितले की पीएमआरडीए सोबत या विषयावर आतापर्यंत **चार वेळा** पत्रव्यवहार झालेला आहे परंतु आतापर्यंत ह्यावर PMRDA कडून ठोस प्रतिक्रिया किंवा कार्यवाही झालेली नाही.

श्री अमित भरते यांनी विषयाचे गांभीर्य माननीय आमदार साहेबांना सविस्तर समजावून दिले जसे की उच्च दाब वाहिन्या जमिनीत गाडले गेले असल्यास व बिघाड झाल्यास तो दुरुस्त करताना अनेक तांत्रिक अडचणी उद्भवतील तसेच नगर रोड हा मुख्य रहदारीचा रस्ता असून प्रचंड वर्दळ असते तसेच जोपर्यंत या गाडल्या गेलेल्या वाहिन्या स्थलांतरीत करण्यात येत नाहीत तोपर्यंत अन्य कुठल्याही प्रकारचे स्थलांतरणा चे **काम करणे योग्य ठरणार नाही** तसेच सध्या आहे त्या परिस्थितीत पीएमआरडीए नी काम सुरू केल्यास आणि बिघाड उद्भवल्यास सुमारे 40,000 वीज ग्राहक प्रभावित होतील त्यामुळे **जनक्षोभ** निर्माण होण्याची ची दाट शक्यता आहे.

सदर विषय आमदार महोदयांनी शांतपणे ऐकून घेतला त्यानंतर श्रीयुत अमित भरते यांना नवीन केबल टाकण्यास किती खर्च येईल असे विचारले त्यावर अमित भरते यांनी महावितरणच्या कार्यालयाने रिवाईज इस्टिमेट एक कोटी साठ लाख रुपयांचे दिलेले आहे अशी माहिती दिली, त्यानंतर आमदार महोदयांनी पीएमआरडीए आयुक्त श्री कुमार साहेब यांना फोन द्वारे याबद्दल तात्काळ माहिती दिली व व गरज पडल्यास दुसरी टेंडर काढावे किंवा हे टेंडर रिवाईस करावे अशी विनंती केली.

सदर चार उच्चदाब वीज वाहिन्या **वाघेश्वर चौकात** दरम्यान रस्ता रुंदीकरणाच्या कामात सात ते आठ फूट जमिनीत गाडल्या गेलेल्या आहेत ह्या पुढील **सर्व सोसायट्यांना वीजपुरवठा करतात.**

दिनांक 9July2020 रोजी श्री कुंभार साहेब हे शाखा अभियंता यांच्या सोबत सदर स्थळाची पाहणी करणार आहेत.

**13.** लॉक डाउन मूळे अतिरिक्त विजेची बिले आलेली आहेत त्यासंदर्भात शंकासमाधान तसेच समस्या निवारण कक्ष वाघोली मध्ये देण्यात यावा तसेच वाघोली येथील विविध सोसायट्यांमध्ये कॅम्पचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी वाघोली हाउसिंग सोसायटीच्या वतीने करण्यात आली होती त्यावर उत्तर देताना श्री भरते साहेब यांनी अशा प्रकारची व्यवस्था महावितरण तर्फे आधीच करण्यात आलेली आहे असे सांगितले. आमदार महोदयांनी अनेकांना सरासरीपेक्षा फारच अधिक रकमेची बिलं आलेली आहेत व सर्वसाधारण वीज वापर केला असताना सुद्धा इतक्या अधिक रकमेचे बिल येणे अशक्य आहे असे सांगितले त्याला उत्तर देताना श्री भरते ह्यांनी अशा संदर्भात मीटर रिडींग ची पडताळणी कडून चुकीचे रीडिंग घेतले आहे का किंवा मीटर मध्ये बिघाड आहे का याबाबत चौकशी करावी लागेल असे सांगितले आणि चुकीच्या रीडिंग मुळे जास्त बिल आले असल्यास ते बिल कमी करण्यात येईल असे आश्वासन दिले

**Address**: - Parijat-301, Som Terraces, Gat No-647, Wagholi, Haveli, Pune - 412207
**Reg. No.**: - U90009PN2019NPL181904 (Section 8 Company, Companies Act 2013)
**Phone**: - +91-9881056253, +91-9370116228
**Email**: - info@wagholihsa.org | **Web**: - www.wagholihsa.org









महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,




महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,